Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 08 February 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०८ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीला आज सकाळी आठ वाजता टपाली मतदानाच्या मोजणीनं प्रारंभ झाला. आतापर्यंत सर्व ७० जागांचे कल हाती आले असून सध्याच्या घडीला ४० जागांवर भारतीय जनता पक्ष तर ३० जागांवर आम आदमी पक्ष आघाडीवर आहे.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत अपात्र ठरलेल्या लाभार्थी महिलांना जानेवारी महिन्यापासून सन्मान निधी वितरित केला जाणार नसल्याचं, महिला आणि बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी सांगितलं आहे. समाजमाध्यमावरील आपल्या संदेशात तटकरे यांनी ही बाब नमूद केली. मात्र, अपात्र ठरलेल्या लाभार्थी महिलांना जुलै ते डिसेंबर २०२४ या काळात वितरित झालेला निधी परत घेतला जाणार नाही, असंही तटकरे यांनी स्पष्ट केलं आहे.

****

भारत सरकारच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या धर्तीवर ‘कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च’ या विषयावर राष्ट्रीय पातळीवर सर्वेक्षण होणार आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२५ दरम्यान होत असलेया या पाहणीत निवड झालेल्या कुटुंबांकडून मागील ३६५ दिवसांमध्ये कुटुंबाच्या आरोग्यविषयक होणाऱ्या खर्चाबाबत विस्तृत माहिती संकलित करण्यात येईल.

ही पाहणी राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये होणार असून या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश, शासकीय आणि खासगी दवाखान्यातून मिळणाऱ्या उपचारांवर कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च, लसीकरण, गर्भवती महिलांना मिळणाऱ्या सुविधांचा तपशील अशी माहिती गोळा करणं हा आहे. नमुना तत्वावर निवडण्यात आलेल्या घटकातील कुटुंबाकडून प्राप्त माहितीवर आधारित निष्कर्ष राज्यातील

लोकसंख्येकरिता अंदाजित केले जातील. सर्वेक्षणाकरिता घरी येणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांना सर्व संबंधित कुटुंबियांनी पूर्ण सहकार्य करण्याचं आवाहन अर्थ आणि सांख्यिकी संचालनालयानं केलं आहे.

****

ज्येष्ठ पत्रकार, मार्मिक या मासिकाचे माजी कार्यकारी संपादक पंढरीनाथ सावंत यांचं आज पहाटे मुंबईत त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय मंत्रालय यांचा लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्कार, मुंबई मराठी पत्रकार संघाचा पुढारीकार ग. गो. जाधव पुरस्कार तसंच मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचा कृ. पां. सामक जीवनगौरव पुरस्कारानं त्यांना सन्मानित करण्यात आलं आहे. प्रबोधनकार ठाकरे आणि बाळासाहेब ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू म्हणून पंढरीनाथ सावंत यांना ओळखलं जात होतं.

****

नाशिक इथं देशातील पहिलं विवाहपूर्व समुपदेशन केंद्र सुरू होणार आहे. येत्या महिला दिनी हे केंद्र स्थापन केलं जाणार असल्याची माहिती राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी काल नाशिक इथं पत्रकारांना दिली. नाशिक मधलं हा पथदर्शी प्रयोग यशस्वी झाल्यास देशपातळीवर अशी केंद्रं सुरु करण्यात येतील, असं रहाटकर यांनी सांगितलं. केवळ महिलांच्या समस्यांबाबत महिलांच्या ग्रामसभा घेण्यात याव्यात यासाठी विचार सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

सोयाबीनच्या खरेदीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही चर्चा करणार असल्याचं, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी सांगितलं आहे. ते काल लातूर इथं बोलत होते. सोयाबीनचे दर वाढवायचे असतील तर सोयाबीनची पेंड भारताबाहेर निर्यात करण्याची गरज पटेल यांनी व्यक्त केली.

****

नांदेड जिल्ह्याच्या बिलोली तालुक्यात सगरोळी इथं आज राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. मुंबईचं महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि सगरोळीच्या संस्कृती संवर्धन मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हे संमेलन ज्येष्ठ साहित्यिक अच्युत गोडबोले यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याचं, स्वागताध्यक्ष प्रमोद देशमुख यांनी कळवलं आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर प्रथमच सीमावर्ती भागात हे संमेलन होत आहे.

****

लातूर जिल्हा परिषदेचा प्राथमिक शिक्षण विभाग आणि स्टिम एज्युकेशन सेंटर, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने लातूरमध्ये 'महाआकाश दर्शन २०२५' या उपक्रमाचं काल आयोजन करण्यात आलं. लातूरच्या राजस्थान विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित या उपक्रमात लातूर जिल्ह्यातील १२०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभागी घेतला. खगोलशास्त्र आणि आकाश निरीक्षणाच्या मूलभूत संकल्पनांची वैज्ञानिकांद्वारे विस्तृत माहिती या उपक्रमात दाखवण्यात आली.

****

मुंबईत आयोजित एल ॲन्ड टी. मुंबई खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत माया राजेश्वरननं काल महिला एकेरीची उपांत्य फेरी गाठली. मायानं उपउपांत्य फेरीत जपानच्या मेई यामागूची हिचा पराभव केला. तर महिला दुहेरीत प्रार्थना थुंबारे आणि अरियाना हावतोनो यांच्या जोड़ी ने उपांत्य फेरीत एडल सिल्वा आणि एनास्तासिया तिखोनोवा या जोडीचा पराभव करत सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत प्रवेश केला.

****